अहवाल क्रमांक :१३७

पंचायती राज समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

रायगड जिल्हा परिषदेच्या सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालच्या संदर्भात

बारावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २० डिसेंबर, २०१२ रोजी विधानसभेस/ विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१२

पंचायती राज समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

रायगड जिल्हा परिषदेच्या सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालच्या संदर्भात

बारावा अहवाल

(तीन)

पंचायती राज समिती

(सन २०१२-२०१३)

(३१ ऑक्टोबर, २०१२)

समिती प्रमुख

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१५. श्री.जयकुमार रावल, वि.स.स.

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

२१. श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

(चार)

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रीत

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली व श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागांवर श्री.एम.एम.शेख, वि.प.स. व श्री.दिपक साळुंखे, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी पंचायती राज समितीचे समिती सदस्य म्हणून मा.सभापती, विधानपरिषद यांनी नामनियुक्ती केली आहे.

(पाच)

पंचायती राज समिती

(सन २०१२-२०१३)

(३१ मे, २०१२)

समिती प्रमुख

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१५. श्री.जयकुमार रावल, वि.स.स.

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

२१. रिक्त

(सहा)

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. रिक्त

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रीत

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली, वि.प.स. व श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१२ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पदे रिक्त आहेत.

(सात)

पंचायती राज समिती
(२०१०-२०११)
(दिनांक ४ मार्च, २०१०)

समिती प्रमुख

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

समिती सदस्य

२ ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

(आठ)

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्रविधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव,
श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी,

(नऊ)

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा बारावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१२-२०१३ करिता समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००५-२००६ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१०-२०११ साठी गठीत झालेल्या समितीने रायगड जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने रायगड जिल्हा परिषदेस दिनांक ५, ६ व ७ मार्च, २०१२ रोजी भेट देऊन श्री.अभिजित बांगर, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.ल.मा.पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१२-२०१३ करिता गठीत झालेल्या समितीने रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्याबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी जिल्हा परिषद, रायगड संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधीच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी अप्पर मुख्य सचिव, (मदत कार्य व पुनर्वसन) अतिरिक्त कार्याभार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, प्रधान सचिव, वने, प्रधान सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, दुग्धविकास विभाग, प्रधान सचिव, अदिवासी विभाग, प्रधान सचिव महिला व बालकल्याण विभाग, प्रधान सचिव, रोजगार हमी योजना व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, पर्यावरण विभाग, उप सचिव आणि संचालक पाणी पुरवठा विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, डीडीएसएस, सार्वजनिक आरोग्य विभाग, सह संचालक, रा.ग्रा.आ.अ. मुंबई, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

(दहा)

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत..

सन २०१२-२०१३ साठी गठीत झालेल्या समितीने दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवन :
नागपूर,
दिनांक :१७ डिसेंब, २०१२

चंद्रकांत दानवे,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

(अकरा)

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरण क्रमांक	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(४)
		रायगड जिल्हा परिषद	
१	एक	बृहत आराखड्याप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्राचे नसलेले नियोजन	१
२	दोन	हृदय रोग असणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांचा उपचारांमध्ये होणारी हेळसांड/निष्काळजीपणा	७
३	तीन	ग्रामीण नळपाणी पुरवठा योजना :- बेलवली वारदोळ नळपाणी पुरवठा योजनचे प्रंलबित असलेले काम	१२
४	चार	महिला व बालकल्याण विभाग : गरीब महिलांना शिवण मशीन पुरविणे	१५
५	पाच	पंचायत समिती, माणगांव, पंचायत समितीमधील गैरव्यवहाराची प्रकरणे	१९
		परिशिष्ट	
		समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त	२३

प्रकरण एक

जिल्हा परिषद, रायगड

१.१ बृहत आराखड्याप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्राचे नसलेले नियोजन :-

पंचायत समितीने रायगड जिल्हा परिषदेच्या सन २००५-२००६ या वर्षातील वार्षिक प्रशासन अहवालातील प्रश्नावली क्रमांक १ बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून बृहत आराखड्यानुसार जिल्ह्यातील आदिवासी व बिगर आदिवासी भागामध्ये किती प्राथमिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे कार्यरत आहेत, अद्याप किती ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे सुरु करण्याकरीता काय कार्यवाही करण्यात आली आहे याबाबतची माहिती मागविली.

मुख्य कार्यकरी अधिकारी यांनी समितीस सन २००५-२००६ या वित्तीय वर्षात बृहत आराखड्यानुसार रायगड जिल्ह्यांत १५ तालुके असून त्यामध्ये १ तालुका आदिवासी भागामध्ये (कर्जत तालुक्याचा काही भाग) व उर्वरित १४ तालुके बिगर आदिवासी भागात येतात. तीन प्राथमिक आरोग्य केंद्रे व १९ उपकेंद्रे कार्यान्वित आहेत. बिगर आदिवासी भागात ४९ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २६९ उपकेंद्रे कार्यान्वित आहेत. शासनाचे निकषानुसार रायगड जिल्ह्यांत एकूण ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रे मंजूर व कार्यरत असून त्यापैकी ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे आदिवासी भागात व ४९ प्राथमिक आरोग्य केंद्रे बिगर आदिवासी भागात कार्यरत आहेत. तसेच जिल्ह्यांत एकूण २८८ उपकेंद्रे कार्यरत असून त्यामधील आदिवासी भागात १९ उपकेंद्रे कार्यरत आहेत. बिगर आदिवासी भागात २६९ उपकेंद्रे माहे मार्च, २०१० अखेर कार्यकरत आहेत. शासनाने १९९१ च्या बृहत आराखड्यानुसार खालीलप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे सुरु करणे आवश्यक आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रे

१. आदिवासी क्षेत्रात - निरंक

२. बिगर आदिवासी क्षेत्रात १५ प्राथमिक आरोग्य केंद्र बृहत आराखड्यानुसार सुरु करणे आवश्यक असून त्यापैकी २ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित झालेली आहेत

उपकेंद्रे

१. आदिवासी क्षेत्र - निरंक

२. बिगर आदिवासी क्षेत्रात बृहत आराखड्यानुसार १८८ उपकेंद्रे सुरु करणे आवश्यक आहे त्यापैकी ११ उपकेंद्रे कार्यन्वित झालेली आहेत.

सध्या रायगड जिल्ह्यांत ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २८८ उपकेंद्रे कार्यान्वित आहेत, अशी लेखी माहिती दिली.

१.२ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची साक्ष :

पंचायती राज समितीने दिनांक ०५ मार्च, २०१२ रोजी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी बृहत आराखड्याप्रमाणे बिगर आदिवासी क्षेत्रामधील उर्वरित १३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १७७ उपकेंद्रे कार्यान्वित

करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदने कोणते प्रयत्न केले, बिगर आदिवासी क्षेत्रात १५ प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरु करणे आवश्यक असताना फक्त दोनच प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरु आहेत. तसेच सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना इमारती आहेत काय अशी समितीने विचारण केली असता यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रायगड जिल्ह्यात ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २८८ उपकेंद्रे कार्यान्वित आहेत. उर्वरित प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरु करण्यासाठी शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आली आहेत. शासनाने ज्या ज्या केंद्रांना मंजुरी दिली त्याप्रमाणे आरोग्य केंद्रे सुरु करतो व जी केंद्रे मंजुर आहेत ती कार्यान्वित आहेत. तसेच जिल्ह्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रांना जागा नाहीत. आदिवासी क्षेत्रातील आंबीवली प्राथमिक केंद्राच्या ठिकाणी जागेची अडचण होती त्या ठिकाणी नविन आर्थिक वर्षापासून काम सुरु करणार आहोत असा खुलासा केला.

खालापुर तालुक्यातील चौक येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामिण रुग्णालयात करण्यात आले असुन तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र दोन किलो मिटर अंतरावर मंजुर केले पण ते निकषात बसत नसल्याने कार्यान्वित झाले नाही ते प्राथमिक आरोग्य केंद्र चार किलो मिटरवरील मोहपाडा (रसायनी) ता. खालापुर येथे सुरु करणेबाबत मागणी केली असताना ते चौक येथील ग्रामीण रुग्णालयात चालू आहे. सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्र मोहपाडा येथे सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता त्यासंदर्भात अतिरिक्त मुख्य सचिवांना पत्र पाठविले असुन याबाबत जिल्हधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली आहे. याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले तसेच चौक येथे ग्रामिण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रे एकाच ठिकाणी चालू आसल्याने तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र मोहाडी येथे स्थलांतरित करणेबाबत प्रयत्न करण्यात यावा असे समितीने सांगितले असता एप्रिलमध्ये करण्याचा प्रयत्न करु असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

१.३ भेटीच्या वेळी घेतलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुद्यांबाबतची माहिती मागविली.-----

१. रायगड जिल्ह्यातील जे वैद्यकिय अधिकारी तसेच ग्रामसेवक मुख्यालयी रहात नाहीत त्यांच्यावर काय कारवाई केली आहे,

२. खालापुर तालुक्यातील चौके येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मोहपाडा (रसायनी) येथे सुरु करण्याबाबत जिल्हा परिषदेने शासनाकडे मागणी केली आहे काय, असल्यास केव्हा,

३. प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरित करावे या मागणीस शासनाने परवानगी न देण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरित करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे.

रायगड जिल्हा परिषदेकडून समितीस उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

१. रायगड जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकारी व ग्रामसेवक नेमुन दिलेल्या मुख्यालयी ठिकाणी राहण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्हास्तरीय क्षेत्रिय अधिकाऱ्यामार्फत वेळोवेळी भेटी देवून संबंधित अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहतील अशी दक्षता घेण्यात येत आहे.

२. शासन निर्णय क्रमांक पीएचसी/१०९७/२८६/प्र.क्र./२६/आरोग्य-४/दिनांक २६ डिसेंबर, १९९७ अन्वये प्राथमिक आरोग्य केंद्र चौके स्थलांतराचे स्थान मौजे वावंढळ येथे निश्चित केले होते. मात्र मौजे वांवढळ येथे जागा उपलब्ध होत नसल्याने या कार्यालयाकडील पत्र जा. क्र.राजिप/आखा/विस्तार/०६ दिनांक ०२/०३/२०१२ अन्वये प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप अंतर्गत असलेल्या मौजे वासांबे मोहोपाडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र चौकचे स्थलांतर करणे बाबतचा जिल्हा नियोजन मंडळाकडील प्रस्ताव मा. सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

३. मा. सहसंचालक, आरोग्य सेवा (प्राथमिक आरोग्य केंद्र, जिपस्तर), मुंबई यांच्याकडील पत्र जा.क्र.सआसे/जिपस्तर/प्राआकेंद्र/पुणे/टि-७/कक्ष-७अ/२०१२ दि.२३/२/२०१२ अन्वये प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून अद्यापर्यंत स्थलांतरित करण्यास परवानगी आदेश या कार्यालयास मिळालेले नाहीत.

१.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

रायगड जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने विभागीय सचिवांची दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी समितीने साक्ष घेतली. समितीने जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी संबंधित वैद्यकिय अधिकारी मुख्यालयी रहात नसल्याचे आढळून आले होते त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली अशी विचारणा केली असता संबंधितांची पुणे येथील संचालक कार्यालयात बदली करण्यात आली आहे असे सांगितले. मोहपाडा गावाची लोकसंख्या जास्त असून तेथील स्थानिकांनी मागणी करुन ठराव केला आहे त्यामुळे चौक येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मोहपाडा येथे सुरु करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे आणि प्राथमिक आरोग्य केंद्राची श्रेणी वाढ झाल्यावर पूर्वीचे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतर करण्याचे कोणते निकष आहेत तसेच चौक येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वावल येथे स्थलांतरीत करण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता यासंदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर करण्याबाबतचा पहिला निकष लोकसंख्येचा असून बिगर आदिवासी भागाकरिता ३० हजार आणि आदिवासी व डोंगरी भागाकरिता २० हजार लोकसंख्या असणे आवश्यक आहे. शासनाच्या सुचनांनुसार त्याच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दिमध्ये इतर ठिकाणी ते स्थलांतरित करण्यात यावे. मोहपाडा हे गाव लोहोप प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असून चौक प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येत नाही. मोहपाडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून तपासण्यात येत आहे तसेच मोहपाडा हे गाव चौक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्राबाहेर येत आहे. वावल येथे प्राथमिक आरोग्य केंद्र घेण्याचा निर्णय जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांनी घेतलेला आहे असे समितीस सांगितले. यासंदर्भात समितीने अशीही विचारणा केली की, जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना असे अधिकार आहेत काय, त्यांनी सर्व प्रक्रिया पुर्ण केली आहे काय, यावर स्थानिक स्तरावर ठराव मंजुर झालेला आहे. त्यास जिल्हा परिषद आरोग्य समिती आणि जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी मान्यता दिली आहे तसेच तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अप्पर मुख्य सचिव यांचेशी चर्चा केलेली आहे. तसेच यास कर्योत्तर मान्यता घेण्याची कार्यवाही करावी लागेल असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीस सांगितले तर प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरित करीत असताना ते मुळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात करावे लागते असे स्थलांतर

करण्यासाठी जिल्हा परिषदेचा ठराव संबधित डी.पी.डी.सी.चा ठराव त्यांच्या मान्यतेने संचालक आरोग्य सेवा यांचेकडे प्रस्ताव पाठविला जातो. त्यांच्या अभिप्रायासह शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर मा.मंत्री महोदयांच्या मान्यतेनंतर ती संस्था स्थलांतर करण्याचा शासन निर्णय निर्गमीत केला जातो असे विभागीय सचिवांनी सागितले.

१.५ अभिप्राय व शिफारशी :-

रायगड **जिल्ह्यामध्ये बृहत आराखड्यासनुसार प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नियोजनबाबत समितीच्या निदर्शनास आले की, चौक येथील प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरित करताना स्थानिक स्तरावर ठराव मंजुर करुन जिल्हा आरोग्य अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली असली तरी वावल येथे स्थलांतरित करण्यात आलेले प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थलांतरित करण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात आलेली नाही.**

मोहपाडा हे गाव लोहोप प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत येत असले तरी लोहोप आणि मोहपाडा यातील अंतर १२ कि.मी. आहे. मोहपाडा गावातील लोकांना त्याचा उपयोग होत नाही त्यांना आरोग्य सेवेसाठी पनवेल येथे जावे लागते त्यामुळे स्थानिक लोकांच्या गरजेनुसार आणि मागणीनुसार मोहपाडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत झाले आहे.

शासनाने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संदर्भात नविन बृहत आराखड्यास मान्यता दिलेली आहे. तथापि, १९९१ बृहत आराखड्यानुसार बिगर आदिवासी क्षेत्रात १५ प्राथमिक आरोग्य केंद्र तर १८८ उपकेंद्र सुरु करणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी आरोग्य सेवा उपलब्ध नाही अशा गावातील लोकांवर अन्याय होत आहे ती गावे आरोग्यसेवेपासून वंचित राहत आहे. अशा लोकांना आरोग्याच्या सुविधा मिळण्यासाठी उपरोक्त प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र लवकरात लवकर सुरु करण्यात यावी अशी समिती शिफरीस करित आहे.

विशिष्ट भौगोलिक परिस्थिती त्या परिसरातील लोकांची संख्या व आरोग्यकेंद्र निमार्ण करण्याची आवश्यकता विचारात घेता समिती अशी शिफारस करते की, स्थानिक राजकारणाचा विचार न करता मोहपाडा येथे प्राथमिक आरोगयकेंद्र सुरु करण्यासाठी शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्यात यावी व प्राथमिक आरोग्यकेंद्र लवकरात लवकर सुरु करण्यात यावे. त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती दिड महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

रायगड जिल्ह्यात बऱ्याच प्राथमिक आरोग्य केद्रांना स्वतःच्या जागा/इमारती नाहीत यासंदर्भात प्राथमिक आरोग्य केद्रांसाठी स्वतःच्या जागेची व इमारतीची आवश्यकता असल्याने याबाबत शासनाने प्राधान्याने विचार करण्यात यावा. तसेच आंबवली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या कामास निधी मंजुर करुन कामास तात्काळ सुरुवात करण्यात यावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

याच अनुषंगाने समितीची आणखी अशी शिफारस आहे की, जिल्ह्यातील आदीवासी बिगर आदीवासर मोठ्याप्रमाणात नागरीकरण झालेल्या ग्रामीण भागातील सर्वसामान्य व गरीब लोकांना आरोग्याच्या दृष्ठीने सुविधा पुरविण्यासाठी जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र स्थापित करण्यासाठी जिल्ह्याचा जो बृहतआराखडा तयार केला जातो त्या आराखड्याप्रमाणेच प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र नि ार्मण करणे नित्यांत गरजेचे असते ही बाबत

विचारत घेता असा आराखडा सर्वंकष विचार विनिमय करुनच नियोजन पध्दतीने तयार करणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने सर्व जिल्हा परिषदांना मार्गदर्शनपर सूचना सविस्तर परिपत्रकाद्वारे देण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण दोन

२.१ हृदय रोग असणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांची उपचारांमध्ये होणारी हेळसांड/निष्काळजीपणा :-

सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक १ मधील शालेय आरोग्य कार्यक्रम यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून अहवाल वर्षात पंचायत समिती निहाय किती शाळांतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करणेत आली तसेच किती विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली नाही व त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ? तसेच वैद्यकीय तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थ्यांना क्षयरोग, कुष्ठरोग, हृदयरोग व दंतक्षय वा इतर गंभिर स्वरुपाचे आजार असल्याचे आढळून आले आहे, असल्यास गंभिर आजार असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य उपचारासाठी मोठ्या दवाखान्यात पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली होती काय, नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व त्याप्रकरणी निष्काळजीपणा दाखविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली, उक्त कालावधीत गंभिर आजाराने पिडीत असलेल्या विद्यार्थ्यांचा वैद्यकीय तपासणीचा अहवाल संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांना देण्यात आला आहे काय असल्यास, किती विद्यार्थ्यांचा वैद्यकिय तपासणीचा अहवाल विद्यार्थ्यांच्या पालकांना देण्यात आला आहे नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबतची लेखी माहिती मागविण्यात आली त्यानुसार, अहवाल वर्षात पंचायत समिती निहाय २८५० शाळांमध्ये १,५६,९३२ विद्यार्थ्यांचा समावेश असून त्यापैकी १,५३,०२० विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करणे आली व तपासणी दरम्यान गैरहजर असले कारणाने ३९१२ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी होवू शकली नाही. वैद्यकीय तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांना क्षयरोग-१, कुष्ठरोग-४, हृदयरोग-४६ व दंतक्षय-५९४९ आजार असल्याचे आढळून आले, त्यापैकी १०३३ विद्यार्थ्यांना जिल्हा रुग्णालय येथे पुढील तपासणीसाठी पाठविणेत आले आहे, उक्त कालावधीत गंभिर आजाराने पिडीत असलेल्या ४६ विद्यार्थ्यांचा वैद्यकीय तपासणीचा अहवाल संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांना शाळेतर्फे संदर्भ सेवा (रीफरल लेटर) पत्राने देणेंत आला आहे. अशी लेखी माहिती प्राप्त झाली.

२.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

समितीने दिनांक ०७ मार्च, २०१२ रोजी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. सदरच्या साक्षीच्या वेळी अहवाल वर्षामध्ये रायगड जिल्ह्यामध्ये हृदय रोगाच्या ३९ केसेस आढळून आल्या असून त्यापैकी किती विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता सन २००५-२००६ मध्ये संपूर्ण जिल्ह्यामध्ये ३९ हृदयरोग झालेले विद्यार्थी आढळून आले त्यापैकी ३ विद्यार्थी मरण पावले उर्वरित ३६ विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांची शस्त्रक्रिया करण्यात आली, त्यांची प्रकृती आता चांगली आहे असे

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले तर एकूण ३६ विद्यार्थ्यांपैकी १० विद्यार्थ्यांवार शस्त्रक्रिया करण्यात आली इतर विद्यार्थ्यांची टु.डी.इको ट्रिटमेंट करुन त्यांचेवर उपचार करण्यात आले असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियानामार्फत विद्यार्थ्यांना आरोग्याची मदत देण्यात येते तसेच जीवनदायी योजनेतून मदत केली जाते तर शस्त्रक्रिया केलेले आणि औषधोपचार केलेले एकूण विद्यार्थ्यांच्या सांगितलेल्या संख्येमध्ये विसंगती आहे निश्चित माहिती दिली जात नाही यासंदर्भात सर्व अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली होती काय अशी समितीने विचारण केली असता त्यास उत्तर देण्यात आले नाही.

सन २०१०-२०११ अखेर हृदय रोगाचे किती विद्यार्थी होते अशी समतीने विचारण केली असता हृदयरोगाचे एकूण २५ रुग्ण होते त्यापैकी २२ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली व ३ रुग्णांवर शस्त्रक्रिया करणे बाकी आहे असे शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी सांगितले तर एकूण ४० रुग्णांपैकी १६ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले. उक्त उत्तरामध्ये असणाऱ्या विसंगतीबाबत विचारणा केली असता शिक्षणाधिकरी यांनी आरोग्य विभागाकडून मिळालेल्या यादीनुसार माहिती दिल्याचे सांगितले या विषायाच्या अनुषंगाने विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे भेटीच्या वेळी सांगितले.

२.३ भेटीच्या वेळी घेतलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खाली मुद्यांबाबतची माहिती मागविली.

१. हृदय रोगाची ३९ प्रकरणे आढळून आली आहेत या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित अधिकारी यांची आढावा बैठक घेतली होती काय, घेतली असल्यास केव्हा याबाबत खुलासा करण्यात यावा

२. सन २०१०-२०११ अखेर हृदय रोगाच्या रुग्णांबाबत शिक्षणाधिकारी यांनी विद्यार्थी संख्या २५ सांगितली तथापि, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सदर संख्या ४० असल्याचे सांगितले आहे. उक्त अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीमध्ये विसंगती दिसुन आली याबाबत निश्चित स्थिती काय आहे, याचा खुलासा करण्यात यावा,

जिल्हा परिषदेकडून समितीस उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

१. हृदय रोगाची ३९ प्रकरणे आढळून आली आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित अधिकारी यांची आढवा बैठक घेतली होती. सदर बैठका दिनांक २५/२/२०१२ व दिनांक २८/२/२०१२ रोजी घेतलेल्या आहेत.

२. तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सन २०१०-२०११ मध्ये शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत ४० विद्यार्थी हृदयशस्त्रक्रियेसाठी संदर्भित करण्यात आले आहेत असे सांगितले परंतु ते सन २०११-२०१२ मध्ये माहे फेब्रुवारी, २०१२ अखेर प्रस्तावित विद्यार्थी होते. सन २०१०-२०११ मध्ये शालेय आरोग्य तपासणी अंतर्गत एकूण हृदय रोगाचे २५ विद्यार्थी संदर्भित करण्यात आले होते. प्रत्यक्षात एकूण ३९ विद्यार्थ्यांपैकी ३

मयत झाले असून ६ विद्यार्थ्यांवार शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ३० विद्यार्थ्यांवर उपचार चालू आहेत. त्यांना शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता नाही असे तज्ञ डॉक्टरांनी प्रस्तावित केले आहे.

२.४ विभागीय संचिवांची साक्ष :-

दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी घेतलेल्या मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने हृदयरोगासंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली होती काय अशी विचारणा केली असता त्यासंदर्भात हृदयरोगाची एकूण ३९ प्रकरणे आढळून आली असून दिनांक २५ व २६ फेब्रुवारी, २०१२ रोजी बैठका घेतल्या आहेत. एकूण ३९ हृदयरोग्यांपैकी ३ विद्यार्थी मयत झाले असून ६ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे तर ३० विद्यार्थ्यांवार उपचार सुरु असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले.

२.५ अभिप्राय व शिफारशी :-

समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसुन येते की, अहवाल वर्षात हृदयरोगाचे एकूण ४६ विद्यार्थी असल्याचे लेखी माहितीत नमूद केले आहे तर जिल्हा परिषद येथे झालेल्या साक्षीत ३९ विद्यार्थी असल्याचे सांगितले तसेच २०१०-२०११ मध्ये जिल्हा परिषद येथे झलेल्या बैठकीत शिक्षणाधिकारी यांनी हृदयरोगाचे २५ रुग्ण असल्याचे सांगितले तर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी ४० रुग्ण असल्याचे सांगितले. समितीला दोन्ही वेळा संबंधितांनी दिलेली आकडेवारी विचारात घेता उत्तरामध्ये आलेल्या विसंगतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांनी बैठकी पूर्वी आढावा बैठक घेतल्याचे दिसून येत नाही हे स्पष्ट होते. समितीला विसंगत माहिती देणे यात संबंधित अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणा आणि निष्काळजीपणा असल्याचे दिसुन येते. संबंधित अधिकारी यांनी अशा प्रकारचा आढावा घेतला तर हृदय रुग्ण विद्यार्थ्यांच्या संदर्भातील अचुक माहिती समितीला मिळू शकतली असती, त्यांनी तसे केले नसल्याने याबद्दल समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. तसेच जिल्ह्यामधील ३ विद्यार्थी रुग्ण हृदयरोगाच्या आजाराने मरण पावले असल्याने अशा गंभिर बाबीकडे संबंधित अधिकाऱ्यांनी पुर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

सबब, समिती अशी शिफारस करते की, समितीला विसंगत उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्या संबधित अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करुन कारवाई करण्यात यावी. शालेय विद्यार्थ्यांना होणाऱ्या गंभीर आजारावर राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियानातंर्गत तसेच राज्य शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत आजार लक्षात येताच तात्काळ उपचार करण्यात यावेत. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

समितीची आणखी अशीही शिफारस आहे की, आरोग्य तापसणीत हृदयविकारासारख्या गंभीर स्वरुपाचा आजार आढळून आलेल्या विद्यार्थ्यांवर तातडीने उपचार करुन त्यांना संदर्भ सेवा नियमितपणे मिळण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद आरोग्य अधिकारी, शिक्षाणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक तसेच तालुकास्तरावर कार्यरत असलेले इतर संबंधित अधिकारी यांना एकमेकांशी समन्वय साधून विद्यार्थ्यांची आरोग्य सेवा हे एक राष्ट्रीय कर्तव्य आहे असे मानून एकदिलाने काम करण्यासाठी शालेय शिक्षण/सार्वजनिक आरोग्य विभाग व ग्रामविकास विभाग यांनी

एकत्रित स्वरुपात विचारविनिमय करुन निश्चित स्वरुपाच्या मार्गदर्शक सुचना सविस्तर परिपत्रकाद्वारे देण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण तीन

३.१ ग्रामीण नळपाणी पुरवठा योजना :- बेलवली वारदोली नळपाणी पुरवठा योजनचे प्रंलबित असलेले काम

सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील प्रश्नावली क्रमांक १ मधील ग्रामीण पाणीपुरवठा योजनेसंदर्भात जिल्हा परिषद अंतर्गत मार्च, २००९ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकारणामार्फत पंचायत समिती निहाय किती नळ पाणी पुरवठा योजनांची कामे होती घेण्यात आली होती त्यापैकी प्रत्यक्षात किती योजना पूर्ण होऊन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे, किती पाणी पुरवठा योजना अपूर्ण आहेत व त्याची कारणे काय आहेत ? अशी लेखी माहिती विचारण्यात आली असता त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत मार्च, २००९ पर्यंत पंचायत समिती निहाय एकूण १४ नळ पाणी पुरवठा योजनांचंी कामे हाती घेण्यात आली. त्यापैकी एक नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण होवून पाणी पुरवठा केला आहे उर्वरित १३ नळ पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत, त्यामधील बेलवली वारदोली नळपणी पुरवठा योजना संदर्भात योजनेची अंदाजीत किंमत ११९ इतकी असून ११ मार्च, १९९८ रोजी प्रशासकीय मान्यता तर ७ जानेवारी, १९९८ रोजी तांत्रीक मान्यता मिळाली आहे. तसेच सदर योजनेबाबत मुळ निविदा निर्देशांक गोठवून भाववाढी संबधी अट शिथील करुन भाववाढ फायद्यासह मुदतवाढ विशेष बाब म्हणून देण्यात यावी व प्रलंबित कामे तातडीने करण्याची सूचना मा. मंत्री पापु यांनी दिनांक १७/६/२००८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या आहेत त्याप्रमाणे भाववाढीची अट शिथील करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता सध्या योजनेचे काम बंद आहे ठेकेदारास दंडात्मक कार्यवाहीची नोटीस बजावली आहे. सदर काम ठेकेदार करीत नसल्याने काम काढून घेण्यात आले आहे. भौतिक प्रगती ५० टक्के पूर्ण आहे अशी लेखी माहिती प्राप्त झाली.

३.२ मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांची साक्ष :-

पंचायती राज समितीने दिनांक ०७ मार्च, २०१२ रोजी जिल्हा परिषदेला प्रत्यक्ष भेट देवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. सदरहू साक्षीत ठेकेदाराला किती दंड आकारण्यात आला, दंडात्मक कारवाईची नोटीस केंव्हा बजाविण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता यासंदर्भात सुरवातीला निधीची उपलब्धता भाववाढ

यामुळे काम रखडले होते तसेच शासन स्तरावर प्रस्तावस मंजुरी मिळण्यास विलंब लागला असून योजनेचे ५० टक्के काम पूर्ण झाले आहे असे कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी समितीस सांगितले. तसेच ठेकेदारास नोटीस पाठविली असून निधी वेळेवर न मिळाल्यामुळे कारवाई मागे घेण्यात यावी अशी ठेकेदाराने विनंती केलेली आहे. तथापि, ठेकेदारास दंड किती आकारला याचे उत्तर देण्यात आले नाही. यांसदर्भात कामाची नस्ती मागवून उत्तर घेण्यात यावे असे समितीने सांगितले असता त्यास उत्तर देण्यात आले नाही.

३.३ भेटीच्या वेळी घेतलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यसाठी समितीने विभागाकडून खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.

१. बेलवली वारदोली नळ पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात ठेकेदारावर किती रक्कमेचा दंड आकारण्यात आला, नसल्यास त्याची कारणे काय ?

२. संबंधित ठेकेदाराकडून दंड वसुल करण्यात आला आहे काय व केव्हा ?

रायगड जिल्हा परिषदेकडून समितीस उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

१. बेलवील वारदोली नळ पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात करार क्र.B-१/४७ सन १९९८-९९ अंतर्गत ठेकेदार मे.डी.एन.पाटील यांच्यावर मा.अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नवीन पनवेल यांचे पत्र क्र.३०१० दि.१८/१२/२००९ अन्वये (१६/११/२००९ पासून दि. १५/२/२०१० पर्यंत) (काम काढून घेतलेली तारिख) प्रतिदिनी रुपये ५०००/- प्रमाणे ४६०००/- एवढा दंड आकारण्यात आला आहे.

२. सदरचे काम निविदा अटी व शर्ती कलम ३ सी. खाली काढून घेतल्यानंतर सदर ठेकेदाराच्या जबाबदारी व दायित्वावर दुसऱ्या ठेकेदाराकडून करुन घेत असलेले काम प्रगती पथावर आहे. दंडाची आकारलेली उक्त रक्कम रुपये ४६०००/- वसुल करण्याची कार्यवाही चालू आहे.

३.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने मंत्रालयीन सचिवांची दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सदरहू नळ पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात ठेकेकदारावर किती रक्कमेचा दंड आकारण्यात आला व नसल्यास त्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता, बिलाची रक्कम २ लाख शिल्लक होती बिल भरण्याकरिता ९ दिवसांचा उशिर झाला. ४ लाख ६० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला, ७० हजार रुपयांची बँक गॅरंटी सुरवातीला घेण्यात आलेली आहे. सन १९९९ मध्य निधीची कमतरता असल्यामुळे सन २००८ मध्ये काम सुरु झाले कामास विलंब झाल्यामुळे दंड आकारण्यात आला असून संबंधितांकडून काम काढून घेण्यात आले आहे असे सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी समितीस सांगितले.

३.५ अभिप्राय व शिफारशी :-

पाणीपुरवठा **योजनेस सन १९९८ मध्ये प्रशासकीय व तांत्रीक मान्यता मिळूनही सन २००८ पर्यंत योजनचे काम सुरु करण्यात आले नाही. योजनेची मुळ अंदाजित किंमत ११९ इतकी असून दहा वर्षात भाववाढीमुळे त्यामध्ये निश्चितच वाढ झालेली आहे. पाणीपुरवठ्यासारख्या आवश्यक, महत्वाच्या व निकडीच्या योजनांना निधी उपलब्ध करुन न देणे निश्चितच भुषणावह नाही असे समितीचे मत आहे. ठेकेदाराने केलेल्य निष्काळजीपणामुळे त्याला दंड आकारणे, त्याचेकडून काम काढून घेणे एवढ्यावरच ही कारवाई थांबविण्यात येऊ नये तर योजनेला विलंब करणाऱ्या सदरच्या ठेकेदारास काळ्या यादित टाकण्यात यावे. या संदर्भात सदरहू योजनेस विलंब झाल्याप्रकरणी विलंबाची चौकशी करण्यात येऊन दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाला समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

याच अनुषंगाने समितीची आणखी शिफारस आहे की, सदर योजनेसाठी ठेकेदाराला दिलेल्या अग्रिमाची व्याजासह वसुली करावी व त्यानंतरच त्याला काळ्या यादीत टाकवे. १९९८ मध्ये मंजुरी मिळालेल्या योजनेचे काम सन २००८ पर्यंत प्रलंबित ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण चार

४.१ महिला व बालकल्याण विभाग : गरीब महिलांना शिवण मशीन पुरविणे :

समितीने सन २००५-२००६ च्या प्रशासन अहवालाच्या प्रश्नावली क्रमांक १ मधील महिला व बालकल्याण विभागाच्या अखत्यारित असलेल्या गरीब महिलांना शिलाई मशीन पुरविण्याबाबत जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये एकूण १ लाख तरतूद करण्यात आलेली असून सदरची तरतूद अखर्चीत असून, तरतूद मार्च, २००६ अखेर प्राप्त झाल्यामुळे शिल्लक राहिली असल्याचे नमूद केले.

४.२ मुख्य कार्यकारी अधिकार, जिल्हा परिषद यांची साक्ष :-

समितीने दिनांक ०७ मार्च, २०१२ रोजी प्रत्यक्ष जिल्हा परिषदेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. सदरहू साक्षीच्या वेळी गरीब महिलांना शिलाई मशीन पुरविण्याअंतर्गत रुपये १ लाख इतकी तरतूद केली असताना ती सर्व रक्कम अखर्चित राहिली आहे. पुरवठादार यांनी पुरवठा आदेश न स्विकारल्यामुळे रक्कम शिल्लक राहिली असे म्हटले आहे. याबाबतची परिस्थिती काय आहे, पुरवठा आदेश न स्कि ारण्याची कारणे काय आहेत, लाभार्थी या योजनेपासून वंचित राहीले यास जबाबदार कोण आहे अशी समितीने विचारणा केली असता यांसदर्भात ज्या ठेकेदाराला आदेश देण्यात आले होते त्याने पुरवठा न केल्यामुळे सदरची तरतूद अखर्चित राहिली. ज्यांची निविदा मंजूर करण्यात आली होती त्यांना आदेश दिले परंतु त्यांनी पुरवठा आदेश स्विकारले नाही व पुरवठा केला नाही असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. समितीने अशीही विचारणा केली की, संबंधित पुरवठादाराला काळ्या यादीत टाकले काय तसेच त्यांना पुरवठा आदेश केव्हा देण्यात आले. यासंदर्भात दिनांक २५ मार्च, २००६ ला पुरवठा आदेश दिले असे सांगितले. आर्थिक वर्षाचे शेवटचे पाच दिवस शिल्लक असताना त्यांना इतक्या उशिराने पत्र का देण्यात आले, तसेच आपण पुरवठादाराला बदनाम करीत

आहात, स्वतः केलेल्या चुका त्यांच्या नावे पुढे करत आहात, यास जबाबदार कोण आहेत तथापि, याबाबत उत्तर देण्यात आले नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतची माहिती घेऊन समितीला अहवाल सादर करावा असे निदेश दिले त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संमती दिली.

४.३ भेटीच्या वेळी घेतलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुद्याबाबतची माहिती मागविली.

१. दिनांक २५/३/२००६ रोजी उशिराने पुरवठा आदेश कोणी दिले, उशिराने पुरवठा आदेश दिल्यामुळे लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिले त्यास जबाबदार कोण आहेत व त्यांच्यावर काय कारवाई केली अथवा करण्यात येणार आहे याबाबत खुलास करण्यात यावा.

२. गरीब महिलांना शिवण मशीन पुरविण्याबाबत निविदा सादर करुन निविदा मंजूरी नंतर कार्यादेश न स्वीकरण्यासाठी संबंधित निविदाधारकास काळ्या यादीत टाकण्याबाबत कारवाई करण्यात आली आहे काय व केव्हा ?

३. तसेच, उक्त निविदाधारकाने कार्यादेश स्विकारले नसल्याने दुसत्या क्रमांकाच्या निम्नतम दर असणाऱ्या निविदाधारकास कार्यादेश देण्यात आले आहेत काय ?

४. असल्यास, दरफरकाची रक्कम कार्यादेश नाकरणाऱ्या निविदाधारकांकडून वसूल करण्यात आली आहे काय ? नसल्यास त्याची कारण काय ?

त्यानुसार जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

१. शिलाई मशीनचे दरकरार शासनाने दि.३/२/२००६ रोजी मंजुर केले असून सदरचे दरकरार या कार्यालयास समाजकल्याण विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांचमार्फत दि.१०/३/२००६ रोजी प्राप्त झाले. त्यानुसार मे.सुत्रावे इंजिनिअरींग वर्क्स जि.सोलापूर यांना दि.२४/३/२००६ रोजी मे.सुत्रावे इंजिनिअरींग वर्क्स करारनामा करुन पुरवठा आदेश घेऊन जाणेसाठी न आल्याने या कार्यालयाचे पत्र क्र.११९३/दि.२५/३/२००६ अन्वये मंजुर दरकरारान्वये आपण शिलाई मशीनचा पुरवठा करावयाचा आहे की नाही याचे स्पष्टीकरण हे पत्र मिळताच सादर करावे अन्यथा आपणास पुरवठा करावयाचा नाही असे गृहीत धरुन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल व आपले नाव काळ्या यादीत टाकणेबाबत शासनास कळविणेत येईल, असे लेखी कळविणेत आले होते. तरीही मे.सुत्रावे इंजिनिअरिंग वर्क्स जि.सोलापूर यांनी कार्योदेश न स्विकारल्यामुळे संबंधित निविदाधारकास काळ्या यादीत टाकण्यास्तव कळविणेत आलेले आहे.

२. गरीब महिलांना शिवण मशीन पुरविण्याबाबत दरकरारानुसार कार्यादेश न स्विकारल्यामुळे संबंधित निविदाधारकांस काळ्या यादीत टाकण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.मबाक-२/१३२६/दि.२४/४/२००६ अन्वये मा.सहसंचालक, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांना कळविणेत आलेले आहे.

३. सदर बाबतीत मे.सुत्रावे इंजिनिअरींग वर्क्स जि.सोलापूर यांचा शिवण मशीन साहित्यासाठी शासनमान्य दरकरार असल्याने दुसऱ्या निविदाधारकास कार्यादेश देण्यात आले नाहीत.

४. सदर बाबतीत या कार्यालयाचे पत्र क्र.मबाक-२/१३२६/दि.२४/४/२००६ अन्वये मा.सहसंचालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांना मे.सुत्रावे इंजिनिअरींग वर्क्स जि.सोलापूर या एजन्सीचे नाव काळ्या यादीत टाकणेबाबत कळविणेत आलेले आहे.

४.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

उरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शिलाई मशीनचा विलंबाने पुरवठा केल्यामुळे लाभार्थी योजनेपासून वंचित राहिले याबाबत पुरवठादारावर कोणती कारवाई केली व पुरवठादाराची निवड कोणी केली यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, शिलाई मशीनचा पुरवठा करण्यासाठी मे.सुत्राचे इंजिनिअरींग वर्क्स जि.सोलापूर या कंपनीबरोबर सी.एस्.डी.ओ. यांचेकडून दरकरार निश्चित केला होता दरकराराप्रमाणे शिलाई मशिनचा पुरवठा करणेबाबत त्या कंपनीला आदेश देण्यात आले होते. कंपनीला लेखी स्वरुपात पत्र पाठवून तसेच दुरध्वनीवरुन संपर्क साधूनही त्यांनी आदेश स्विकारले नाहीत व पुरवठा देखील केला नाही. तसेच सदरहू कंपीनीची निवड उद्योग विभागाच्या सी.एस्.डी.ओ. यांनी केली होती. या संदर्भात कंपनीला काळ्या यादीत टाकण्यासाठी जिल्हा परिषदेला प्रस्ताव तयार करुन तेव्हाच पाठविला आहे.

४.५ अभिप्राय व शिफारशी :-

गरीब महिलांना शिलाई मशीन पुरविण्यासाठी विभागाने आर्थिक वर्षाचे शेवटचे पाच दिवस शिल्क असताना लेखी स्वरुपात व दुरध्वनीवरुन पुरवठा आदेश दिले तथापि, कंपनीने पुरवठा केला नाही त्यामुळे लाभार्थी या योजनेपासूप वंचित राहिले. सदरचा पुरवठादार पुरवठा करीत नसल्याचे समजल्यावर शासनाने दुसऱ्या पुरवठादाराकडे मागणी नोंदविणे आवश्यक होते तथापि तसे त्यांनी प्रयत्न केलेले नाहीत त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना सदरहू योजना राबविण्याबाबत स्वारस्य नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे यासंबंधात दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यांचेवर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

पुरवठादाराला लेखी पत्र पाठवून व दुरध्वनी करुनही पुरवठा केला नाही त्यामुळे सदरची कंपनी यात दोषी असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. याप्रकरणी संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

वर्षाच्या शेवटी माहे मार्च अखेर खरेदी प्रक्रीया पुर्ण करुन पुरवठाधारकास कार्यादेश देणे ही बाबत साहित्याचा पुरवठा वेळेच्या आत होण्यास अडचणीचे ठरत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सबब, जिल्हा परिषदेने कोणतेही साहित्य खरेदीची निविदा व इतर कार्यवाही माहे फेब्रुवारी अखेर पुर्ण करुन कोणत्याही स्थितीत दिनांक १५ मार्च पर्यंत पुरवठा आदेश देण्याविषयीच्या सूचना शासनाने सर्व जिल्हा परिषदांना द्याव्यात, अशी समितीची शिफारास आहे.

समितीने केलेल्या शिफराशींवर शासनाने कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा.

प्रकरण पाच

५.१ पंचायत समिती, माणगांव, पंचायत समितीमधील गैरव्यवहाराची प्रकरणे :-

रायगड जिल्हा परिषद सन २००५-२००६ या वर्षातील वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात दिनांक ०६ मार्च, २०१२ रोजी माणगाव पंचायत समितीला दिलेल्या भेटीच्या वेळी समितीने खालील मुद्यांवर लेखी माहिती मागविली

अ) पंचायत समितीमध्ये सन २००५-२००६ मध्ये गैरव्यवहाराची किती प्रकरणे उघडकीस आली, प्रकरण निहाय गैरव्यवहाराचे स्वरुप काय आहे व त्यात गंतुलेली रक्कम तसेच अधिकारी/कर्मचारी किती आहेत व त्यापैकी किती प्रकरणे निकालात काढण्यात आली,

ब) प्रलंबित प्रकरणांपैकी किती प्रकरणांची चौकशी झाली आहे व किती प्रकरणे जिल्हा परिषदेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली,

क) सन २००५-२००६ पूर्वी उघडकीस आलेली, परंतु अद्याप निकालत न निघालेली प्रकरणे किती व ती प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

ड) वरील (क) मध्ये विचारलेल्या प्रकरणांपैकी जुन्यात जुनी प्रकरणे केव्हापासूनची आहेत, त्यावर गटविकास अधिकारी माणगाव यांचेकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

अ) सन २००५-२००६ मध्ये गैरव्यवहाराचे प्रकरण उघडकीस आले नाही,

ब) सन २००५-२००६ मध्ये गैरव्यवहाराचे एकही प्रकरण उघडकीस आले नाही त्यामुळे कार्यवाही करणेत आली नाही,

क) सन २००५-२००६ पुर्वी उघडकीस आलेली एकूण प्रकरणे १८ होती पैकी निकालात निघालेली ४ प्रकरणे आहेत व अद्याप निकालात न निघालेली एकूण १४ प्रकरणे आहेत. सदर प्रकरणामध्ये वसुली होणे बाकी असलेने प्रलंबित आहेत,

ड) सदर प्रकरणांपैकी जुन्यात जुने प्रकरण सन १९७३-७४ पासूनचे आहे.

५.२ मुख्य कार्यकारी अधिकार, जिल्हा परिषद यांची साक्ष :-

समितीने दिनांक ६ मार्च, २०१२ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी गटविकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २००५-२००६ पूर्वी उघडकीस आलेल्या १८ प्रकरणांपैकी ४ प्रकरणे निकाली निघाली असून उर्वरित १४ प्रकरणे प्रलंबित आहेत तर ४ प्रकरणे निकाली म्हणजेच काय, आणि निकाली न निघालेल्या एकूण १४ प्रकरणांमध्ये किती रक्कमेचा अपहार झाला आहे या संदर्भात गटविकास अधिकारी यांनी निकाली न निघालेल्या १४ प्रकरणांमध्ये एकूण २२ लाख ६१ हजार रुपयांचा अपहार झालेला आहे असे सांगितले यासदर्भात निकाली न निघालेल्या १४ प्रकरणांची साक्ष घेण्यात येईल असे समितीने भेटीच्या वेळी सांगितले.

५.३ समितीस भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगान खालील मुद्या संदर्भात अधिक माहिती मागविली

सन २००५-२००६ पूर्वी उघडकीस आलेल्या परंतु अद्याप निकाली न निघालेल्या १४ गैरव्यवहाराच्या प्रकरणाच्या संदर्भात संबंधितीत अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे काय असल्यास केव्हा,

जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

सन २००५-२००६ पुर्वी उघडकीस आलेल्या परंतु निकाली न निघालेल्या १४ गैरव्यवहाराच्या प्रकरणांपैकी ९ प्रकरणांची अंतिम पुर्तता झालेली असल्याने प्रकरणी अपहारीत रक्कमांचे समायोजन व वसुली पुर्णपणे झाली असल्याने प्रकरणे निकाली काढणेची कार्यवाही करणेत येत आहे. ३ प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल केला असून २ प्रकरणी जबाबदार व्यक्ती मयत असल्यामुळे वारसदारा कडून वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

५.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

समितीने रायगड जिल्हा परिषदेसंदर्भात माणगाव पंचायत समितीस भेट देवून घेतलेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने सन २००५-२००६ पूर्वी उघडकीस आलेल्या परंतु निकाली न निघालेल्या १४ गैरव्यवहाराच्या प्रकरणांच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल केला आहे काय ? अशी विचारणा केली असता उपरोक्त १४ प्रकरणांपैकी ९ प्रकरणांध्ये वसुली झालेली असून एक फौजदारी प्रकरण आहे. तीन उर्वरित प्रकरणांची चौकशी प्रक्रिया चालू आहे. संबधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करुन चौकशी चालू आहे. चौकशीचा अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी समितीस सांगितले.

५.५ अभिप्राय व शिफारशी :-

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीच्या वेळी समितीला प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये सन २००५-२००६ पूर्वी उघडकीस आलेली १८ प्रकरणांपैकी ०६ मार्च, २०१२ पर्यंत फक्त चार प्रकरणे निकाली निघाली असून १४ प्रकरणे बाकी आहेत तसेच दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ पर्यंतच्या ७ महिन्यात उक्त प्रकरणांपैकी ९ प्रकरणांची वसुली करण्यात आली आहे सदरची प्रकरणे २००५-२००६ पूर्वी केव्हा उघडकीस आली याबाबतची माहिती देण्यात आलेली नाही. समितीने जिल्हा परिषदेस भेट देण्याचे निश्चित केल्यानंतर सदरच्या प्रकरणांवर कारवाई सुरु करण्यात आली तसेच साक्ष घेण्यात येणार असल्याने १४ प्रकरणांपैकी ९ प्रकरणांची वसुली केली म्हणजेच ६ महिन्यात उक्त प्रकरणांबाबत कारवाई करण्यात आली आणि अजूनही बाकीच्या प्रकरणांवर कारवाई सुरु आहे. तसेच ९ प्रकरणांची एकूण किती वसुली करण्यात आली व उर्वरित प्रकरणांची किती वसुली बाकी आहे याबाबतची माहिती समितीला देण्यात आली नाही. यावरुन जिल्हा परिषदेचा निष्काळजीपणा दिसुन येतो. सबब, प्रलंबित असलेल्या अफरातफरीच्या ४ प्रकरणांची लवकरात लवकर विभागीय चौकशी पूर्ण करण्यात यावी आणि संपूर्ण १८ प्रकरणांचंी चौकशी करण्यासाठी निष्काळजीपणा दाखविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन व त्यांची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी.

गैरव्यवहाराची प्रकरणे निकाली निघून त्यास गुंतलेली रक्कम वसूल करुन त्वरीत शासन जमा व्हावी म्हणून गैरव्यवहाराची प्रकरणे एक निश्चित कालमर्यादा ठरवून देऊन त्या कालमर्यादेतच प्रकरणे निकाली काढणे बाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सहा महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

परिशिष्ट
समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

सोमवार दिनांक ५ मार्च, २०१२

स्थळ :- जिल्हा परिषद सभागृह (अलिबाग) जि. रायगड

उपस्थिती

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

३. श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४. श्री. हणमंतराव पाटील-बेट मोगरेकर, वि.स.स.

५. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८. श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.

९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१०. डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.

११. श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

१२. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१३. श्री. अनिल राठोड, वि.स.स.

१४. श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१५. श्री. नितीन भोसले, वि.स.स.

१६. श्री. सुरेश नवले, वि.प.स.

१७. श्री. विक्रम काळे, वि.प.स

१८. श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

१९. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव

स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय

श्री. र.बा.भागवत, संचालक

ग्रामविकास विभाग, मंत्रालय

श्रीमती ए.व्ही. वायुझडे, कक्ष अधिकारी

जिल्हा परिषद रायगड

श्री. अभिजित बांगर, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. जि.एम.चौधरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. वसंत पाटील, प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं

श्री. प्रकाश खोपकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. एस.आर.पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प./बां.क.)

श्री. ल.मा.पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री. एस.जी.माळे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री. ए.एस.कोळी, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)

श्री. बी.एस.पाटील, कृषि विकास अधिकारी

श्री. पी.आर.पवार, शिक्षणाधिकारी (प्रा)

श्री. जी.डी. जोगदंडे, शिक्षणाधिकारी (मा.)

श्री. रवींद्र कदम, समाज कल्याण अधिकारी

डॉ. पी.डी.बागुल, जिल्हा पशुसुवर्धन अधिकारी

श्री. डी.एल.साळावकर, प्रभारी गट विकास अधिकारी, पं.स. अलिबाग

श्री. पी.एम.साळुंखे, गट विकास अधिकारी, पं.स.पेण

श्रीमती एस.व्ही. पुंड, गट विकास अधिकारी, पं.स.पनवेल

श्री. के.बी.पाटील,गट विकास अधिकारी, पं.स.उरण

श्री. वाय.एम.प्रभे, गट विकास अधिकारी, पं.स.कर्जत

श्री. डी.एन.तेटगुरे, गट विकास अधिकारी, पं.स.खालापूर

श्री. व्ही.एम.म्हात्रे, गट विकास अधिकारी, पं.स.सुधागड-पाली

श्री. उन.टी.देसले, गट विकास अधिकारी पं.स.रोहा

श्री. सी.पी.पाटील, गट विकास अधिकारी पं.स.मुरुड

श्री. एम.डी.चिनके, गट विकास अधिकारी पं.स.माणगं ाव

श्री. बी.डी.इंगळे, गट विकास अधिकारी पं.स. तळा

श्री. एस.जी.धुत्रे, गट विकास अधिकारी पं.स. म्हसळा

श्रीमती एस.के.भगत, गट विकास अधिकारी पं.स. श्रीवर्धन

श्री. एम.डी.चिनके, प्रभारी गट विकास अधिकारी पं.स.महाड

श्री. बी.एन.जगताप, गट विकास अधिकारी पं.स.पोलादपूर व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील रायगड जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

बुधवार दिनांक ३ ऑक्टोबर, २०१२

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री. वैजनांथ शिंदे, वि.स.स.

४. श्री. दिलीप माने, वि.स.स.

५. श्री. भारत भालके, वि.स.स.

६. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

७. श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.

८. श्री. दादाराव केचे, वि.स.स.

९. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१०. श्री. संजय राठोड, वि.स.स.

११. श्री. सुर्यंकात दळवी, वि.स.स.

१२. डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.

१३. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री. भा.ना.कांबळे, सह सचिव

२. श्री. गंगाधर कोहळे, उप सचिव

३. सौ.मेघना तळेकर, उप सचिव

४. श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव

स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य

श्री. के.एम.विधाते, संचालक

विभागीय प्रतिनिधी

श्री. जे.एस.सहारिया, उप्पर मुख्य सचिव (मदत कार्य व पुनर्वसन) अतिरिक्त कार्याभार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग

श्री. प्रवीण परदेशी, प्रधान सचिव, (वने)

श्री. अनिल डिग्गीकर, प्रधान सचिव, पशु संवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग

डॉ.आर.पी.सागर, प्रधान सचिव, अदिवासी विकास विभाग

श्री. उज्वल उके, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग

श्री. व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, रोजगार हमी योजना व जल संधारण विभाग

श्री. एस.के.मुखर्जी, प्रधान सचिव, सा.बा.विभाग

श्रीमती. वल्सा नायर सिंह, सचिव, पर्यावरण विभाग

श्रीमती शैला, ए.उप सचिव आणि संचालक पाणी पुरवठा विभाग

श्री. आण्णासाहेब मिसाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड,

श्री. कांतीलाल उमाप, उप सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग

डॉ. विजय बाविस्कर, डीडीएचएस, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री. गिरीश भालेराव, सह संचालक, रा.ग्रा.का.अ.रायगड जिल्हापरिषद

श्री. राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अप्पर मुख्य सचिव, (मदत कार्य व पुनर्वसन) अतिरिक्त कार्याभार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, प्रधान सचिव, वने, प्रधान सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, दुग्धविकास विभाग, प्रधान सचिव, अदिवासी विभाग, प्रधान सचिव महिला व बालकल्याण विभाग, प्रधान सचिव, रोजगार हमी योजना व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, पर्यावरण विभाग, उप सचिव आणि संचालक पाणी पुरवठा विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, डीडीएसएस, सार्वजनिक आरोग्य विभाग, सह संचालक, रा.ग्रा.आ.अ. मुंबई, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची साक्ष घेतली.

दिनांक - १७ डिसेंबर, २०१२
स्थळ : विधान भवन, नागपूर
उपस्थिती

समिती प्रमुख

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
४. श्री.दादाराव केचे, वि.स.स.
५. श्री.जयकुमार रावल, वि.स.स.
६. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.
७. श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.
८. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रीत

९. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने बैठकीत समितीच्या बाराव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.